महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

॥ शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी ॥

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प २.०

(महाराष्ट्र शासन आणि जागतिक बँक यांचा संयुक्त प्रकल्प)

Maharashtra Project on Climate Resilient Agriculture

(Project of Government of Maharashtra in Partnership with the World Bank)

प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई,
कृषि विभाग

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष 2026

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प २.०

पार्श्वभूमी

महाराष्ट्र राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून असून, राज्याच्या आर्थिक विकासामध्ये कृषि उत्पन्नाचा वाटा भरीव आहे. मागील दशकामध्ये वेगाने होत असलेल्या हवामान बदलामुळे राज्यातील शेतीवर प्रतिकूल परिणाम होत असून त्यामुळे पिकांच्या उत्पादनात देखील चढउतार दिसून येत आहेत. राज्यातील सुमारे ८२ % जमीन कोरडवाहू असल्यामुळे पिकांच्या वाढीच्या अवस्थेत जेव्हा जेव्हा पावसात खंड पडतो तेव्हा पाण्याच्या कमतरतेमुळे उत्पादकतेवर प्रतिकूल परिणाम होतो. त्याबरोबरच अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे शेतीचे आणि पिकांचे मोठे नुकसान होते. या सगळ्याचा फटका सर्वच शेतकऱ्यांना आणि विशेषतः लहान व सीमांत शेतकऱ्यांना सहन करावा लागतो. वाढते तापमान, अनियमित पाऊस, तीव्र दुष्काळ व अतिवृष्टी आणि दिवसेंदिवस कमी होत असलेली जमीनधारणा यामुळे शेतीमधील जोखीम वाढली आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या क्रयशक्तीवर देखील परिणाम होऊन एकूणच शेती क्षेत्रापुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे. अशा प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीशी सामना करण्यासाठी शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक वाढविण्याबरोबरच नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे आणि युवक व महिलांचा शेतीव्यवसायाच्या निर्णयप्रक्रियेमध्ये सहभाग वाढविणे गरजेचे झाले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जागतिक बँकेच्या सहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प २.० हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याचे ठरवले आहे.

प्रकल्पाचा उद्देश

महाराष्ट्रातील निवडक जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेतीतील नफ्यात वृद्धी करणे.

प्रकल्प क्षेत्राची व्याप्ती

या प्रकल्पामध्ये महाराष्ट्रातील २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावांचा समावेश करण्यात आला आहे. हवामान बदलास (अ) संवेदनशीलता, (ब) असुरक्षितता आणि (क) नैसर्गिक आपत्ती या प्रमुख निकषांच्या आधारे प्रत्येक तालुक्यातून निवडलेल्या लघुपाणलोट क्षेत्रामध्ये ही गावे समाविष्ट आहेत. निवडलेल्या गावांमध्ये ३२ लाख हेक्टर वहितीखालील क्षेत्र असून २३.६९ लाख खातेदार आहेत आणि त्यापैकी ९२% खातेदार हे अल्प व अत्यल्प भूधारक आहेत.

प्रकल्प कालावधी

प्रकल्पाचा कालावधी सहा वर्षे असून सन २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

प्रकल्प अंमलबजावणीसाठी विविध स्तरावरील समित्या

- राज्यस्तरावर सुकाणू समिती : प्रकल्पाच्या अंमलबजावणीविषयी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली सुकाणू समिती कार्यरत आहे. ही समिती प्रकल्पाच्या अंमलबजावणी आराखड्यास मान्यता देण्याबरोबरच दरवर्षी प्रकल्पाचा वार्षिक आराखडा मंजूर करते.
- जिल्हास्तरीय समन्वय समिती : प्रकल्पातील प्रत्येक जिल्ह्याच्या स्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समिती कार्यरत आहे. ही समिती प्रामुख्याने प्रकल्प गावांचा हवामान अनुकूल आराखडा मंजूर करणे आणि प्रकल्प अंमलबजावणी प्रभावी होण्यासाठी विविध विभाग आणि भागधारक यांचेमध्ये समन्वय ठेवण्याचे काम करते.
- गावस्तरावर ग्राम कृषि विकास समिती: राज्य शासनाने २०२० मध्ये राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये शेतीविषयक " ग्राम कृषि विकास समिती" स्थापन केली आहे. ही समिती प्रकल्प गावाचा हवामान अनुकूल आराखडा तयार करणे, प्रकल्पाच्या लाभासाठी इच्छुक शेतकऱ्यांच्या अर्जांना मंजुरी देणे, प्रकल्पातील घटकांची अंमलबजावणी करून घेणे तसेच प्रकल्पांतर्गत लाभांचे सामाजिक अंकेक्षण करणे इ. जबाबदाऱ्या पार पाडते.



प्रकल्पातून शेतकऱ्यांना, शेतकरी गटांना आणि गावांना होणारे लाभ

वैयक्तिक लाभाचे घटक



वैयक्तिक लाभासाठी अर्ज करणे व अटी

- प्रकल्प गावातील शेतकऱ्यांना आपला ॲग्रीस्टॅक मधील शेतकरी ID क्रमांक वापरून प्रकल्पाच्या https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/ या संकेतस्थळाद्वारे किंवा कृषि विभागाच्या महाविस्तार ए आय अप द्वारे अर्ज सादर करता येईल.
- ५ हेक्टर पर्यंत एकूण जमीन धारणा असणारे शेतकरी वैयक्तिक लाभासाठीच्या घटकांसाठी पात्र राहतील. बिजोत्पादन लाभासाठी कमाल जमीन धारणेची अट लागू नाही.
- परसातील कुक्कुटपालन व शेळीपालन या घटकांसाठी फक्त भूमिहीन कुटुंबातील व्यक्ती, विधवा, परित्यक्त्या, घटस्फोटीत महिला पात्र असतील.
- वैयक्तिक लाभासाठीच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना प्रकल्पाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत



मृद व जलसंधारण आणि पुनर्भरण उपचार

१. प्रकल्प गावाच्या ग्राम कृषि विकास समितीमार्फत प्रत्येक गावात सूक्ष्मनियोजन करून पाण्याच्या ताळेबंदानुसार मृद व जलसंधारण कामांचे आराखडे तयार केले जाणार आहेत.
२. प्रकल्पाच्या आणि महाटेंडर पोर्टलद्वारे ऑनलाइन पद्धतीने तांत्रिक मान्यता, कंत्राटदाराची निवड तसेच पूर्ण झालेल्या कामांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे.
३. मृद व जलसंधारण आणि पुनर्भरण उपचार घटकांच्या मार्गदर्शक सूचना प्रकल्पाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत



कृषि व्यवसायासाठी अर्थसहाय्य

- शेतकरी उत्पादक कंपनी/गटांनी कृषि व्यवसाय घटक/ बाबींचा लाभ घेण्यासाठी https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/ या संकेतस्थळावर भेट द्यावी.
- पात्र लाभार्थी:
  १. शेतकरी उत्पादक कंपनी - प्रकल्प जिल्ह्यात नोंदणीकृत व कार्यरत असावी. २. प्रकल्प गावातील नोंदणीकृत आत्मा नोंदणीकृत शेतकरी गट. ३. प्रकल्प गावातील उमेद / महिला आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत कार्यरत महिला स्वयं-सहाय्यता बचत गट /ग्राम संघ / प्रभाग संघ / लोकसंचालित साधन केंद्र ४. पेसा क्षेत्रातील ग्रामसभा/ ग्रामपंचायत
- कृषि व्यवसाय घटकाच्या मार्गदर्शक सूचना प्रकल्पाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत

प्रकल्प अंमलबजावणीसाठी सामंजस्य करार व संस्थात्मक भागीदारी

प्रकल्पाच्या उद्देशाशी निगडीत आणि शेतकऱ्यांच्या गरजांवर आधारित संशोधन आणि विकसन करण्याच्या हेतूने तसेच प्रकल्प क्षेत्रामध्ये सामाजिक बांधिलकी वाढविण्याच्या उद्देशाने विविध नामांकित संशोधन संस्था, शासकीय विभाग तसेच सामाजिक संस्थांशी भागीदारी करण्यात येत आहे.

IIT BOMBAY · भारतीय विज्ञान संस्थान · महाबीज · NIPHM · Gokhale Institute of Politics and Economics · Umed · MAVIM · Paani Foundation · WOTR · ICAR · VANAMATI

प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी संस्थात्मक व्यवस्था

- प्रकल्पाची अंमलबजावणी कृषि विभागामार्फत करण्यात येणार असून गावस्तरावर सहाय्यक कृषि अधिकारी हे ग्राम कृषि विकास समितीशी समन्वय ठेऊन प्रकल्पाची अंमलबजावणी करतील.
- हवामान बदलास पूरक शेती करण्यासाठी महिलांचा पुढाकार आणि सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने प्रकल्पातील प्रत्येक गावात एक प्रयोगशील आणि सुशिक्षित महिला शेतकरी कृषिताई म्हणून कार्यरत असेल.

प्रकल्प अंमलबजावणीमुळे अपेक्षित फलनिष्पत्ती

प्रकल्पाच्या पश्चात गावांमध्ये आणि गावांतील शेतीमध्ये महत्वाचे बदल अपेक्षित आहेत.

१. पाण्याचे संधारण आणि कार्यक्षम वापर
२. खतांच्या आणि अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर
३. रब्बी व उन्हाळी पिकांच्या क्षेत्रामध्ये म्हणजेच पिकांच्या घनतेत वाढ
४. सेंद्रिय कर्बामध्ये वाढ होऊन जमिनीच्या आरोग्यामध्ये सुधारणा
५. हवामान अनुकूल शेती पद्धती अवलंब करणाऱ्या क्षेत्रामध्ये वाढ
६. शेतीविषयक सल्ला आणि प्रकल्पाच्या लाभासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर
७. शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नात वाढ
८. शेतकरी उत्पादक कंपन्यांची वार्षिक नफ्यात वाढ
९. महिला स्वयं-सहायता गटांचा प्रकल्पामध्ये सक्रीय सहभाग

प्रकल्पाचे मोबाईल ॲप्स



प्रकल्प नकाशा



जिल्हानिहाय प्रकल्प गावे संख्या

अ.क्र	जिल्हा	गावे संख्या	अ.क्र	जिल्हा	गावे संख्या
१	छ. संभाजीनगर	२९७	१२	वाशिम	१८९
२	बीड	४०१	१३	यवतमाळ	५५९
३	जालना	१७६	१४	नागपूर	५६३
४	लातूर	२१६	१५	चंद्रपूर	५६१
५	नांदेड	३७५	१६	गडचिरोली	५३२
६	परभणी	१७३	१७	गोंदिया	२९३
७	हिंगोली	१४८	१८	भंडारा	२९१
८	धाराशिव	१३८	१९	वर्धा	३८३
९	अकोला	१४९	२०	जळगाव	३१९
१०	अमरावती	४५४	२१	नाशिक	६७४
११	बुलढाणा	३१०		एकूण	७२०१

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३०ब, आर्केड, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,
मुंबई ४००००५

https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/